MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १४०/२००७/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. बाबासोा आप्पासोा शेख व<br>श्री. गुड्डसोा आप्पासोा शेख,<br>मु.पो. भिवर्गी, ता.जत, जि.सांगली.<br>अर्जदारांतर्फे प्रतिनिधी<br>श्री. हरीभाऊ दिगंबर खापरे, सहसचिव<br>जत तालुका विद्युत धारक असोसिएशन,<br>हॉटेल वृंदावन जवळ, विजापूर रोड,<br>जत, जि. सांगली. | अपेलंट |

**<u>विरूध्द</u>**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा<br>नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,<br>मंडळ कार्यालय, विश्रामबाग,<br><u>सांगली.</u><br>२) कार्यकारी अभियंता (ग्रामीण),<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>संवसु ग्रामीण विभाग, विश्रामबाग,<br><u>सांगली.</u><br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>संख उपविभागीय कार्यालय,<br>संख, ता.जत, जि.सांगली.<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे | विरूध्द पक्षकार |

**<u>कोरम</u> :–** १) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

श्री. बाबासोा आप्पासोा शेख व श्री. गुड्डसोा आप्पासोा शेख, मु.पो. भिवर्गी, ता.जत, जि.सांगली यांनी गट क्र. २२०/६ व २२०/२ येथे विहिरीवर प्रत्येकी ३ अश्वशक्ती शेती पंपासाठी नवीन वीज कनेक्शनला वीज पुरवठा मिळावा यासाठी वितरण कंपनीकडे अर्ज केला आहे व डिपॉझिट दि. २६–३–१९९४ रोजी भरले आहे व मोटार बसविलेचा चाचणी अहवाल दि. २–५–२००३ रोजी दिला आहे व अद्याप वीज कनेक्शन मिळालेले नाहीत. याबाबत अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय सांगली यांचेकडे विहित नमुन्यात तक्रार दाखल केली होती. त्याकामी कक्षाने दि. ३–११–२००७ रोजी निर्णय दिला आहे. प्रकरणाची सुनावणी दि. २–१–२००८ रोजी म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित सांगली ग्रामीण विभाग कार्यालय, विश्रामबाग सांगली येथे दु. ३–३० ते ४–०० या वेळेत पूर्ण करण्यात आली. यावेळी तक्रारदार उपस्थित नव्हते तक्रारदार यांचे तर्फे प्रतिनिधी श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे तर विरूध्द पक्षकार यांचे तर्फे श्री. पी.जे. जेधे, कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफीसर, सांगली मंडल, श्री. आर.एन. कुलकर्णी, सहाय्यक अभियंता, श्री. एस.के. पाटील, कनिष्ठ अभियंता, ग्रामीण विभाग, सांगली हे उपस्थित होते.

याबाबत अपीलदारांचे तक्रारीचे स्वरूप तथा त्यांचे म्हणणे खालील प्रमाणे आहे.

श्री. बाळासोा आप्पासोा शेख व श्री. गुड्डसोा आप्पासोा शेख, मु.पो. भिवर्गी, ता.जत, जि.सांगली यांनी तेथील अनुक्रमे गट क्र. २२०/६ व २२०/२ मध्ये विहिरीवर प्रत्येकी ३ अश्वशक्ती शेती पंपांना नवीन वीज कनेक्शन मिळणे करिता अर्ज केला व वितरण कंपनीकडे तक्रारदारांनी २६–३–१९९४ ला डिपॉझिटची रक्कम भरलेली आहे. मोटार बसविल्याचा चाचणी अहवाल पूर्वी २–५–२००३ मध्ये दिलेले आहेत. अद्याप वीज कनेक्शन मिळालेले नाही. वितरण कंपनीकडे यासाठी पाठपुरावा केला. सूचनेप्रमाणे दि. १९–७–९५ ला कपॅसिटर तपासून कंपनीला कळविले आहे. एक अर्जदार पंचायत समिती तर्फे जाहिर विशेष घटक योजनेत असलेमुळे प्राधान्य देऊन कनेक्शनचे काम व्हावे अशी मागणी करणेत आली.

विरूध्द पक्षा तर्फे म्हणणे मांडण्यात आले कि, सदर दोन्ही ग्राहकांचे कनेक्शन ठिकाणी दि. १८–१०–२००७ रोजी तपासणी केली असता विद्युत संच मांडणी केलेचे निदर्शनास आले नाही. तसेच संबंधित ग्राहकांवर वीज चोरी प्रकरणी कार्यवाही चालू असलेचे नमूद करणेत आले व यास्तव नवीन कनेक्शन देणेचा मुद्‌दा स्थगित ठेवलेचे सांगण्यात आले.

दोन्ही तक्रारदारांनी मोटार पंप बसविलेचे व त्याचे वायरींग कामाचे सुधारीत टेस्ट रिपोर्ट वितरण कंपनीस दाखल करावेत. दोनपैकी एक अर्जदार एकात्मिक ग्रामीण विकास योजने खालील लाभार्थी असलेने कनेक्शनचे काम प्राधान्याने करता येईल. सद्या सदर ठिकाणी खांब उभे केलेले आहे उर्वरित काम पूर्ण करून कनेक्शन देण्यात येईल असे वितरण कंपनीने सांगितले तर तक्रार निघत असलेने नुकसान भरपाईची मागणी तक्रारदार यांचेकडून सोडण्यात आलेचे सांगितले.

सर्व कागदपत्रे, तक्रारदार व वि.प. यांनी केलेले कथन यांचा एकत्रित विचार करता मंचाच्या निदर्शनास खालील बाबी आल्या.

सदर दोन्ही तक्रारदार यांनी दि. २६–३–९४ रोजी डिपॉझीटची रक्कम भरली आहे हे खरे आहे. पण वितरण कंपनीकडे कनेक्शन देण्यासंबंधी तारांची व पोलची उभारणी करणेकामी कोणतीही स्कीम नसलेने इतका विलंब झाला आहे. श्री. गुड्डसोा आप्पासोा शेख हे एकात्मिक ग्रामीण विकास योजना (जवाहर योजना) अंतर्गत लाभार्थी असल्याचे नमूद केले आहे व ते वि.प. यांनी सुनावणीच्या दरम्यान मान्य केले आहे. प्रयत्नाचा एकभाग म्हणून वितरण कंपनीने पत्र क्र. ५८३७ दि. २२–९–२००३ रोजीच्या पत्राने नवीन अंदाजपत्रकास मंजुरी घेणेविषयी कळविले आहे. जेणेकरून तक्रारदार ग्राहकांना वीज पुरवठा देणे सुलभ होईल.

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडे "क्ष" प्रपत्राची सुनावणी दि. ३–११–२००७ रोजी झाली. त्यामध्ये मागणी ठिकाणी दि. १८–१०–२००७ रोजी तपासणी केली असता कोणत्याही प्रकारची जोडणी पूर्व तयारी केलेली दिसत नाही (मोटार बसविणे, अर्थिंग करणे, स्टार्टर कपॅसिटर पेटीत बसविणे इ.). त्यामुळे संचाची जोडणी पूर्ण करून नवीन तपासणी अहवाल दिल्यानंतर सप्लाय कोड प्रमाणे वीज जोडणी देत असल्याचे सांगितले व तसे कक्षाने आपल्या आदेशात नमूद केले आहे.

सर्व कागदपत्रे, सुनावणी, कथने यावरून मंच खालील प्रमाणे निर्णयाप्रत आलेला आहे.

तक्रारदार दोन्ही ग्राहकांनी दि. २६–३–९४ रोजी डिपॉझीट भरून तसेच दि. १९–७–९५ ला कपॅसिटर तपासणी केलेली दिसून येते.

अंतर्गत कक्षाकडे ग्राहकाने दि. ४–९–२००७ रोजी "क्ष" फॉर्ममध्ये अर्ज केल्यावर क्र.सामं/ता/ग्रातनि/८७२६ दि. ३–११–२००७ च्या आदेशावजा पत्राने आपले म्हणणे दिले आहे. त्यात मांडणी संच बसवून तपासणी अहवाल दिल्यानंतर सप्लाय कोडप्रमाणे जोडणी देण्यात येईल या तसेच ग्राहकाच्या वीज जोडणीच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते. त्यात वीज चोरीचा नवीनच विषय घालून सदर विषयाबद्‌दल तक्रार चालविणेचा आम्हास अधिकार नाही असा उल्लेख केला आहे. वितरण कंपनीने आपल्या अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचे आदेशात (क्र. ८७२५/३–११–२००७ व क्र. ८७२६/३–११–२००७) कोणताही निर्णय दिलेला नाही व तक्रारीची सोडवणूक केली नाही ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूरकडे गा–हाणे दाखल करण्याचा दिलेला निर्णय असमाधानकारक व दिशाभूल करणारा आहे. त्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानेधारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ परिशिष्ट ३ नुसार अर्जदारांस नुकसान भरपाई देणेस पात्र आहे असे वाटते.

तथापि वीज कनेकशन त्वरित दिल्यास नुकसान भरपाईची आग्रही मागणी करणार नाही असे ग्राहक प्रतिनिधीने कबूल केले.

सर्व कागदपत्रे, कथने, पुरावे याचा एकत्रित विचार करून मंच खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अपीलदार श्री. बाबासोा आप्पासोा शेख व श्री. गुड्डुसोा आप्पासोा शेख यांनी वीज कनेक्शनसाठी आवश्यक पूर्तता केली असलेने वि.प. यांनी महाराष्ट विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे तरतुदीनुसार वि.प. यांनी अर्जदारांचे शेती पंपास दि. २–४–२००८ पर्यंत वीज पुरवठा करावा.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी करणेत यावी व तसे केलेचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ८.७ चे तरतुदीनुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल "केशवा" बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व),मुंबई–४०००५१ यांचेकडे करता येईल.

| | |
|---|---|
| ( जी. सी. लेले ) | ( एस.आर बांबळे ) |
| सदस्य | सदस्य–सचिव |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |